शासनाच्या विविध विभागांमध्ये आयटी सल्लागार (IT Consultants) नियुक्ती संदर्भात मर्यादा निश्चित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग (मातं)

## शासन निर्णय क्रमांक: आयटी-२०२६/प्र.क्र.७२/मातं

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०१ एप्रिल, २०२६

**संदर्भ:**

1. Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), Dated 05.10.2023.
2. Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), Dated 27.10.2023.
3. Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), Dated 15.12.2023.
4. Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), Dated 05.03.2024.
5. GAD-IT Letter No. Misc-1725/C.R. 364/IT Dated 30.12.2025.
6. शासन निर्णय क्र. संकीर्ण-1725/ प्र.क्र.358/मातं, दि.13.03.2026.

**प्रस्तावना:**

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय व शासन पत्रान्वये (संदर्भ क्रमांक १ ते ६) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, महामंडळे व प्राधिकरणांना विहित प्रक्रियेनुसार सल्लागार नियुक्त करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रशासकीय विभाग स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर सल्लागार नियुक्त करण्यात आले असून, त्यांच्याकडून आयटी तसेच नॉन-आयटी कामे करून घेतले जात आहे. ही बाब लक्षात घेऊन, आता शासनाने नॉन-आयटी सल्लागार नियुक्त करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. म्हणून नॉन-आयटी कामांसाठी/ प्रकल्पासाठी या शासन निर्णयात नमूद कार्यपद्धतीचा अवलंब करून नॉन-आयटी सल्लागारांची सेवा घेता येऊ शकेल. या पार्श्वभूमीवर, आयटी सल्लागारांची सेवा घेण्यासाठी संख्येत मर्यादा आणण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:**

आयटी व नॉन आयटी सल्लागारांच्या नियुक्तीसाठी सर्व प्रशासकीय विभागांनी व त्यांचे अधिनस्त कार्यालये, महामंडळे व प्राधिकरणांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी-

i. सर्व विभागांना त्यांच्या स्तरावर Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), Dated 05.10.2023, चा अवलंब करून जास्तीत जास्त २ (दोन) आयटी सल्लागार नियुक्त करता येईल. विभागांच्या अधिनस्त कार्यालये, महामंडळे व प्राधिकरणांनी देखील याच मर्यादेचे पालन करणे बंधनकारक राहील.

ii. ज्या विभागांनी/कार्यालयांनी यापूर्वी Government Resolution No: GAD-IT 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), Dated 05.10.2023 अन्वये २ पेक्षा अधिक सल्लागार नियुक्त केले असतील, त्यांनी अशा अतिरिक्त सल्लागारांच्या सेवा दि. ३० एप्रिल, २०२६ पर्यंतच चालू ठेवाव्यात. **दि. ०१ मे, २०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत संबंधित विभाग/कार्यालयात २ पेक्षा जास्त आयटी सल्लागार कार्यरत राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.**

iii. वरील संदर्भित क्र.संकीर्ण-१७२५/प्र.क्र.३५८/मातं, दि.१३.०३.२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, महामंडळे व प्राधिकरणांना विहित प्रक्रियेनुसार नॉन-आयटी कामासाठी/प्रकल्पासाठी सल्लागार घेण्याची मुभा राहील.

iv. कोणत्याही प्रकारच्या सल्लागारांची (आयटी/नॉन-आयटी) नियुक्तीसाठी माहिती तंत्रज्ञान विभागाची पूर्वसंमती घेणे बंधनकारक राहील.

v. सदर सूचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी संबंधित विभाग/ कार्यालय प्रमुखांची राहील.

vi. आयटी सल्लागारांची नियुक्ती बाबत मर्यादा मा. मुख्यमंत्री कार्यालय, मा. उप-मुख्यमंत्री कार्यालये, मुख्य सचिव कार्यालय, माहिती तंत्रज्ञान विभाग व माहिती तंत्रज्ञान संचालनालयाला लागू राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०४०११९०८५१६९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.04.01 19:09:55 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

४. मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
९. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
११. शासनाचे सर्व मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. सर्व पोलीस आयुक्त
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२०. सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी
२१. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
२२. निवडनस्ती/मातं.